लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# साहित्य अकादमीतर्फे २८ डिसेंबरला परिसंवाद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** साहित्य अकादमी आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २८ डिसेंबरला 'मराठीतील वाङ्मयीन आणि वैचारिक नियतकालिके' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

विदर्भ साहित्य संघातील अमेय सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. यावेळी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, उपाध्यक्ष राजेंद्र डोळके, अकादमीचे प्रभारी अधिकारी ओमप्रकाश नागर, युगवाणीचे संपादक प्रफुल्ल शिलेदार, अकादमीचे केंद्रीय कार्यकारी मंडळाचे सदस्य नरेंद्र पाठक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

उद्घाटनानंतर दुपारी १२ वाजता वाङ्मयीन नियतकालिके या विषयावर परिसंवाद होणार आहे. साहित्य अकादमीचे सामान्य परिषदेचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात गणेश विसपुते हे इतिहास आणि परंपरा, आसाराम लोमटे सध्याची स्थिती आणि आव्हाने, आशुतोष पोतदार नव्या वाटा आणि भवितव्य या विषयावर विचार व्यक्त करतील. दुपारनंतर वैचारिक नियतकालिके या विषयावर परिसंवाद होणार आहे. राजेंद्र डोळके यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात अरुणा सबाने या सामाजिक जाणिवा आणि नियतकालिके व रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ राजकीय जाणिवा व नियतकालिके या विषयावर बोलतील. त्यानंतर दुपारी ४ वाजता ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या उपस्थित समारोप होणार आहे.